2022-23

# छत्रपती राजर्षी शाहू महाराजांची राष्ट्र उभारणीत भूमिका

संपादक

प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे



राजर्षी शाहू महाराजांच्या स्मृती शताब्दी निमित्ताने आयोजित,
'छत्रपती राजर्षी शाहू महाराजांची राष्ट्र उभारणीत भूमिका आणि योगदान' या विषयावरील
भारतीय सामाजिक विज्ञान अनुसंधान परिषद पश्चिम विभागीय केंद्र, मुंबई यांच्या
अनुदानातून होत असलेल्या राज्यशास्त्र विषयाच्या आंतरविद्याशाखीय राष्ट्रीय परिषदेतील
शोधनिबंधांचा संपादित ग्रंथ

---

# छत्रपती राजर्षी शाहू महाराजांची राष्ट्र उभारणीत भूमिका


-: संपादक :-

**प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे**

-: सह संपादक :-

प्रा. सदाशिव शिंदे
डॉ. संभाजी पाटील
प्रा. ज्ञानेश्वर बनसोडे
प्रा. माधव शेळके
डॉ. वितेश निकते
डॉ. अभिजीत यादव
डॉ. राजशेखर सोलापुरे
प्रा. सुदर्शन पाटील
प्रा. श्रीकृष्णा पांचाळ
प्रा. दिपीका स्वामी

राज्यशास्त्र विभाग,
राजर्षी शाहू महाविद्यालय (स्वायत्त), लातूर



अरुणा प्रकाशन, लातूर

# छत्रपती राजर्षी शाहू महाराजांची राष्ट्र उभारणीत भूमिका (संपादित)

**Role and Contribution of Chhatrapati Rajarshi Shahu Maharaj in Nation Building (Ed.)**


## संपादक :

प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे

## सह संपादक :

प्रा. सदाशिव शिंदे, डॉ. अभिजीत यादव, डॉ. संभाजी पाटील, डॉ. राजशेखर सोलापुरे, प्रा. ज्ञानेश्वर बनसोडे, प्रा. सुदर्शन पाटील, प्रा. माधव शेळके, प्रा. श्रीकृष्णा पांचाळ, डॉ. वितेश निकते, प्रा. दिपीका स्वामी


---


ISBN 978-93-91689-21-6

---

अरुणा प्रकाशन

१०३, ओमकार कॉम्प्लेक्स - अ,

खर्डेकर स्टॉप, औसा रोड, लातूर

मो. ९४२१४ ८६९३५, ९४२१३ ७१७५७


---


© सर्व हक्क - प्राचार्य, राजर्षी शाहू महाविद्यालय (स्वायत्त), लातूर


---


प्रथम आवृत्ती : १२ ऑक्टोबर २०२२

---

मुद्रक : आर्टी ऑफसेट, लातूर

---

अक्षर जुळवणी : हिंदवी कॉम्प्युटर, लातूर

---

मूल्य : ५००.०० रुपये


---


* 'छत्रपती राजर्षी शाहू महाराजांची राष्ट्र उभारणीत भूमिका' या ग्रंथातील सर्व मते आणि अभिप्राय संबंधित लेखकांची असून त्या संबंधी महाविद्यालय प्रशासन, संपादक, प्रकाशक, मुद्रक व वितरक सहमत असतीलच असे नाही.

२५. राजर्षी शाहू महाराजांचे जाती निर्मूलन
व अस्पृश्योद्धारक कार्य
प्रा. भगवंत बोकडे ..............................

२६. राजर्षी शाहु महाराज यांचा राष्ट्रबांधणीतील
राजकीय दृष्टीकोण
प्रा.दीक्षित साहेबराव ज्ञानोबा ..............................

२७. छत्रपती शाहू महाराज आणि शैक्षणिक कार्य
प्रा.डॉ. जगदीश देशमुख ..............................

२८. छत्रपती शाहू महाराज आणि अस्पृश्य
प्रा. डॉ. बिजयसिंग भाबरदोडे ..............................

२९. छत्रपती शाहू महाराज व सामाजिक न्याय
प्रा.डॉ. ज्ञानेश्वर सोनवणे ..............................

३०. छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांची शैक्षणिक कामगिरी
प्रा. महेश शिवाजीराव जाधव ..............................

३१. छत्रपती शाहू महाराजांचे शैक्षणिक धोरण
प्रा. डॉ. प्रवीण भोसले .............................. २०

३२. राजर्षी शाहू महाराजांचे शिक्षण विषयक धोरण
प्रा.शिवरूद्र शरणप्पा बदनाळे .............................. २०

३३. जनकल्याणकारी लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज
डॉ. दयानंद माधवराव गुडेवार .............................. २१

३४. सामाजिक सुधारणांमधील छत्रपती
राजर्षी शाहू महाराजांची भूमिका
डॉ. आनंद मुसळे .............................. २२

३५. सामाजिक कार्यातील छत्रपती शाहू महाराजाचे योगदान
डॉ. मलदोडे साहेबराव रामराव .............................. २२६

३६. शैक्षणिक सुधारणांमधील छत्रपती शाहू महाराजांची भूमिका
प्रा.डॉ.संजय मारोतीराव कोनाळे .............................. २३४

३७. छत्रपती राजर्षी शाहू महाराज : आरक्षण
प्रा. डॉ. अर्जुन उबाळे, वैशाली विठ्ठल राजकर .............................. १३९

३२

# राजर्षी शाहू महाराजांचे शिक्षण विषयक धोरण

प्रा.शिवरूद्र शरणप्पा बदनाळे

आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासात आपल्या शैक्षणिक सामाजिक व आर्थिक कार्याच्याद्वारे बहुजन समाजाला जागृत करून त्यांची सर्वांगीण क्षेत्रात प्रगती घडवून आणणारे प्रजाहितदक्ष सत्ताधिश म्हणजे राजर्षी छत्रपती शाहू महाराज होय. विचारपूर्वक स्वीकारलेल्या सामाजिक किंवा राजकीय तत्वांच्या बाबतीत कोणतीही तडजोड न स्वीकारता या तत्वांची अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यक असलेले असामान्य मानसिक धैर्य छत्रपती शाहू महाराजांजवळ होते. त्यांच्या कार्यामुळेचं त्यांचे व्यक्तिमत्व केवळ कोल्हापूर संस्थानापुरतेच मर्यादीत न राहता संपूर्ण भारतातही लोकप्रिय झाले. आपल्या २८ वर्षाच्या कारकीर्दीत शाहू महाराजांनी अनेक उल्लेखनीय कामे केली. या काळात उच्च मानल्या गेलेल्या जातींनी समाजात सर्वत्र आपले वर्चस्व निर्माण केले होते. व हे वर्चस्व टिकवण्यसासाठी बहुजन समाजावर निरनिराळी सामाजिक व धार्मिक बंधने लादलेली होती. ही स्थिती सुधारण्यासाठी बहुजन समाजात शिक्षणांचा मोठा प्रमाणात प्रसार होण्याची आवश्यकता त्यांना जाणवली.शिक्षणाच्या बाबतीत या समाजाला येणाऱ्या अडचणीचे निराकरण करणे त्यांना आवश्यक वाटू लागले त्यामुळे महात्मा फुले यांच्याप्रमाणेच सामाजिक सुधारणेच्या कार्यात त्यांनी शिक्षणाला प्रमुख स्थान दिले. त्यांच्या एकूण कार्यात शैक्षणिक कार्य अतिशय महत्वाचे आहे. प्रस्तूत शोधनिबंधात खालील मुद्यांच्या आधारे त्यांच्या शैक्षणिक विचारांचा आढावा घेण्यात आला आहे.

**प्राथमिक शिक्षणाला प्राधान्य :**

शाहू महाराजांनी बहुजन समाजाचा शिक्षणविषयक विकास घडवण्यासाठी योजनाबध्द आखणी केलेली होती प्राथमिक शिक्षण मजबूत केल्याशिवाय उच्चशिक्षणांची वाटचाल अवघड असते.त्यामुळे शाहू महाराज म्हणतात प्राथमिक शिक्षणावर माझा भर आहे. तरी माध्यमिक व उच्च शिक्षाणाकडे माझे लक्ष कमी

नाही माझी प्रजा इयत्ता तिसरी जरी शिकून तयार झाली तर त्यांना राजकारभारांचे हक्क आनंदाने देऊन विश्रांती घेतली असती. तथापि अधिकार दान करण्यापुर्वी सर्व लोकांत शिक्षणाचा प्रसार करण्याकडे लक्ष देणे गरजेचे आहे. त्यासाठी त्यांनी सन.१९१३ च्या आदेशानूसार निरनिराळया खेडयामध्ये मंदिरे, चावडी, धर्मशाळा, या इमारतीमधून प्राथमिक शाळा सुरु केल्या तसेच या शिक्षणकार्यात समाजाचा सहभाग मिळवण्याची त्यांनी योजना केलेली दिसते.

**सक्तीचे व मोफत शिक्षण :**

बहुजन समाजांचा शेती हा प्रमुख व्यवसाय होता लहान मुलांपासून मोठया माणसापर्यंत सर्व जण या शेतीत गुंतले जात शिवाय अज्ञानामुळे बहुजन समाजाला शिक्षणाचे महत्व समजलेलेच नव्हते म्हणून महाराजांनी सक्तीच्या शिक्षणांचे धोरण आखले २१ नोव्हेंबर १९१७ मध्ये काढलेल्या जाहीरनाम्या नुसार कोल्हापूर संस्थानात प्राथमिक शिक्षण सक्तीचे करण्यात आले. शिक्षणांसाठी योग्य वय असलेल्या मुलां-मुलीना शाळेत पाठवण्याबदल पालक व गावकामगार यांच्या वर कडक बंधने लागू केली.

**स्त्रीशिक्षण :**

बहुजन समाजाप्रमाणेच स्त्रीजीवनाच्या मागासलेपणाची जाणीव शाहू महाराजांना होती. त्यामुळे त्यांनी राजाराम महाविद्यालयांत शिक्षण घेणाऱ्या स्त्रीयांना फी माफीची सवलत जाहीर केलेली होती आपल्या सुनबाई इंदुमती राणीसाहेब यांना वैधव्य प्राप्त झाल्या नंतर त्यांना शिक्षण देऊन त्यांना कोल्हापूर संस्थानाचे शिक्षण खाते त्याच्याकडे सोपविण्याचा महाराजांचा विचार होता. तथापि राणीसाहेबाच्या मृत्यूमुळे तो पूर्ण झाला नाही. म्हणून संस्थाच्या शिक्षणअधिकारी मिस लिट्लनंतर त्यांनी श्रीमंत रखमाबाई केळवकर यांची नेमणूक केली. यावरून महाराजांचा स्त्रीशिक्षणविषयक दृष्टीकोन स्पष्ट होतो.त्यांच्या मते शिक्षणामुळेच स्त्री ला कुटूंबात व समाजात आदरांचे व मानाचे स्थान मिळणे शक्य होते.

**उच्च व व्यवसाय शिक्षण :**

प्राथमिक शिक्षणाप्रमाणेच शाहू महाराजांनी माध्यमिक व उच्चशिक्षणांला ही महत्व दिले. सन.१८५१ मध्ये कोल्हापूर येथे सुरू झालेल्या एका इंग्रजी शाळेचे सन.१८८१ साली राजाराम महाविद्यालयात रूपांतर झाले.पूढे त्यांनी या महाविद्यालयांचे हस्तांतरण आर्यसमाजाकडे केले नंतर आर्यसमाजाच्या

नियंत्रणाखाली या महाविद्यालयाची प्रगती झाली. सोबतचं शाहू महाराजांनी व्यवसाय शिक्षणांलाही प्राधान्य दिले. गावाचा कारभार व्यवस्थित चालवण्यासाठी महाराजांनी 'पाटील स्कूल व तलाठीस्कूल' सुरू केले या स्कूल मधून पाटील व तलाठयांना सर्वसाधारण जमाखर्च, कायदे,शांतता सुव्यवस्था महसूल विषयक दक्षता इत्यादी विषयांचे शिक्षण दिले जात असे. शिक्षकांसाठी ही प्रशिक्षण केंद्र सुरू केले सहा महिन्याच्या प्रशिक्षण काळात वीस शिक्षकांना अंकगणित,भाषा, शालेय व्यवस्था, अध्यापन पध्दती, इत्यादी विषयांचे प्रशिक्षण दिले जात होते. तसेच तांत्रिक शिक्षणांची समाजात आवड निर्माण व्हावी म्हणून जयसिंगराव घाटगे टेक्निकल इन्स्टिटयूटची' स्थापना केली. या संस्थेत विद्यार्थ्यांना लोहारकाम, गवंडीकाम,सुतारकाम, यांसारख्या विषयांचे शिक्षण दिले जाई. तसेच विद्यार्थ्यांना लष्करी जीवनाविषयी आवड निर्माण व्हावी म्हणून लष्करी शिक्षण देणारे 'इन्फंट्री स्कूल' सुरू केले. विद्यार्थ्यांमध्ये व्यायाम व लष्करी शिक्षण घेण्याची संधी उपलब्ध करून देण्याचे श्रेय छत्रपती शाहू महाराज यांनाच द्यावे लागते.

**विद्यार्थी वसतिगृहांची निर्मिती :**

माध्यमिक, तात्रिक किंवा उच्च शिक्षणाची संधी उपलब्ध असूनही खेडयापाडयांतील अनेक विद्यार्थ्यांना या संधीचा फायदा घेता येत नाही हे महाराजांना जाणवले. शहरात त्यांच्या राहण्या व जेवण्याची सोय होत नाही. शिवाय गरिबी व काही वेळा त्यांची जात या गोष्टींमुळे अडचणी निर्माण होतात हे त्यांच्या लक्षात आले. ही समस्या दूर करण्यासाठी कोल्हापुरात विद्यार्थी वसतिगृहांची निर्मिती करण्याचे धोरण त्यांनी आखले त्यानुसार १८९६ मध्ये कोल्हापुरात सर्व जातीजमातींच्या विद्यार्थ्यांसाठी एक वसतिगृह सुरू केले. तेथे सर्वांच्या राहण्याची व जेवणाची सोय केली. थोडयाच काळात कोल्हापुरमध्ये वेगवेगळया जातींची सुमारे वीस वसतिगृह निर्माण झाली. या वसतिगृहामध्ये विद्यार्थ्यांच्या राहण्याची व जेवणाची व्यवस्था केली जात असे.

**निष्कर्ष :**

सामाजिक परिवर्तनांचे काम करणारे शाहू महाराज भारतातील पहिले समाजसुधारक आहेत. शाहू महाराजांनी केलेल्या मोफत व सक्तीच्या प्राथमिक शिक्षणांच्या कायदयातील तरतुदीना आजच्या प्राथमिक शिक्षणपध्दती मध्ये कार्यक्षमपणे राबवणे गरजेचे आहे. वसतिगृहाच्या निर्मितीतून शाहू महाराजांनी सर्व जाती धर्मातील विद्यार्थ्यांना शिक्षणांची संधी उपलब्ध करून दिली. शाहू

महाराजांनी स्त्री शिक्षणाकडे लक्ष केंद्रीत केल्यामुळे स्त्रीयांची शैक्षणिक प्रगती झाल्याची दिसून येते. सत्यशोधक शाळांची निर्मिती करून शाहू महाराजांनी पुरोहितांच्या एकाधिकारशाहीला लगाम घातला. विद्यार्थ्यांचे कल्याण साधाणाऱ्या गुरूला वंदन करणारा राज म्हणजे शाहू महाराज होय. आजही हा आदर्श राज्यकर्तांनी डोळयासमोर ठेवणे गरजेचे आहे.


**संदर्भ** :

१. प्रा.डॉ.बी.के.शेप, प्राचार्य, डॉ.आर.के.इप्पर :- 'राजर्षी शाहू महाराज' : सामाजिक सुधारणा व सद्य:स्थिती.

२. जी.एल.भिडे, एन.डी. पाटील :- 'महाराष्ट्रातील समाजसुधारणेचा इतिहास'

३. डॉ. पवार जयसिंगराव : - 'राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ'

४. किर धनंजय :- 'लोकराजा शाहू महाराज'-व्यक्तित्व आणि विचार

५. जाधव रमेश :- 'लोकराजा शाहू छत्रपती'

६. साळुंके पी.बी. (संपा) :- 'राजर्षी शाहू गौरव ग्रंथ'



**प्रा.शिवरूद्र शरणप्पा बदनाळे**

राज्यशास्त्र विभाग प्रमुख

महाराष्ट्र महाविद्यालय, निलंगा

Email ID : shivrudra.badnalegmail.com


○○○